नि.दि.दावा क्र. ५१/२०२३
संजिवकुमार वि. विरेंद्र
निशाणी क्र. १६५

<u>उलटतपास प्रतीवादी क्र. १ तर्फे विद्वान विधीज्ञ श्री. एन.बी.बरगट यांच्यातर्फे शपथेवर सुरु-</u>

२. मी भुमि अभिलेख कार्यालय, रामटेक येथे मागिल दोन वर्षापासुन कार्यरत आहे. दिनाक ११/०८/२०२१ रोजी मी रामटेक येथे रुजु झालो. हे म्हणणे खरे आहे की मोजणीचा अर्ज केवळ जमिन मालकच करु शकतो. दिनांक २३/०२/२०२२ रोजी मी मोजणी केली. मोजणी करतांना मी एकटा होतो. मोजणीचा नकाशा मी एकटयाने तयार केला. हे म्हणणे खरे नाही की मोजणीच्या वेळेस विरेंद्र बनकर हजर नव्हता. हे म्हणणे खरे नाही की बनकरची जरी सही असली तरी तो हजर नव्हता.

प्रश्न- जमिनीवर कोणाचा ताबा आहे किंवा नाही हे सांगण्याचा तुम्हाला अधिकार नसतो ?

उत्तर ज्यांचा सातबारा असतो त्यांचा जमिनीवर ताबा असतो.

३. हे म्हणणे खरे आहे की मोजणीच्या तिन प्रती न्यायालयात दाखल केल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की मी वादीच्या सांगण्यावरुन मोजणी नकाशा बनविला. हे म्हणणे खरे नाही की नकाशामध्ये वादीचा खोटा ताबा दाखविला. हे म्हणणे खरे नाही की नकाशामध्ये, विविध रंगाने जो भाग दाखविण्यात आला तो वादीच्या सांगण्यावरुन दाखविण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की निळया रंगाने दाखविलेली जागा वादीच्या ताब्यात असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास प्रतिवादी क्र. २ ते ४ करीता - प्रतिवादी क्र.२ ते ४ गैरहजर,
सबब उलटतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत
माझे समक्ष

SARODE SANDEEP MARUTI

L.R. No. 106-2005
Digitally signed by SARODE SANDEEP MARUTI
Location: Ramtek
Date: 2024.10.25 14:01:01

(एस.एम. सरोदे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
रामटेक

दिनांक २४/१०/२०२४
रामटेक

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are same word to word as per original evidence.

Name of Stenographer : R. J. Khobragade (Gr.-II)